। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २३४ वा । बुधवार, दिनांक १० डिसेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

Email-dainiklatursamachar@gmail.com

## शशी थरूर यांनी नाकारला 'वीर सावरकर पुरस्कार'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : काँग्रेस खासदार शशी थरूर यांना एचआरडीएस इंडिया या स्वयंसेवी संस्थेने 'वीर सावरकर इंटरनॅशनल इम्पॅक्ट अवॉर्ड २०२५' देत असल्याची घोषणा केली आहे. मात्र, थरूर यांनी हा पुरस्कार स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या पुरस्कारासाठी एकूण सहा जणांच्या नावांची शिफारस करण्यात आली होती. त्यामधून संस्थेने थरूर यांची निवड केली आहे.**

शशी थरूर यांना प्रसारमाध्यमांमुळे या पुरस्काराबद्दल माहिती मिळाली. थरूर यांना जेव्हा समजलं की हा पुरस्कार त्यांना दिला जाणार आहे तेव्हा ते नाराज झाले. ते म्हणाले, मला नुकतंच याबाबत समजलं आहे. परंतु, मी स्पष्ट करू इच्छितो की मी असा कोणताही पुरस्कार स्वीकारलेला नाही.

**शशी थरूर यांच्याकडून आयोजकांच्या बेजबाबदारपणावर बोट**

काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी तिरुवनंतपुरम येथे प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, या पुरस्कारासाठी माझ्या नावाची घोषणा करण्यापूर्वी आयोजकांनी किंवा संस्थेने मला विचारलं नाही आणि मी हा पुरस्कार स्वीकारलेलाही नाही. चर्चा न करता, पूर्वकल्पना न देता या पुरस्कारासाठी नाव घोषित केल्याबद्दल शशी थरूर यांनी आयोजकांना बेजबाबदार ठरवलं आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा (१० डिसेंबर) नवी दिल्ली येथील एनडीएमसी कन्व्हेन्शन हॉलमध्ये होणार आहे. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे या कार्यक्रमाचं उद्घाटन करणार आहोत.



**मला न विचारताच नाव घोषित केले**

सदर पुरस्काराबाबत शशी थरूर यांनी एक निवेदन जारी केले आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की हा पुरस्कार, आयोजक, पुरस्कार देणारी संस्था किंवा कुठल्याही संबंधित व्यक्तीने याबाबत मला कुठलीही माहिती न देता घोषणा केली आहे. त्यामुळे या कार्यक्रमात सहभागी होणं किंवा हा पुरस्कार स्वीकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

एचआरडीएस इंडिया ही संस्था वीर सावरकर इंटरनॅशनल इम्पॅक्ट अवॉर्ड प्रदान करत आहे. संस्थेने आयोजित केलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला उपराज्यपाल मनोज सिन्हा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## २०२६ मधील सार्वजनिक सुट्ट्यांची यादी जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या २०२६ या वर्षातील सार्वजनिक सुट्ट्या महाराष्ट्र सरकारकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्य सरकारकडून यावेळी भाऊबीजेच्या दिवशीही सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या वर्षात २४ सुट्ट्या असणार आहेत.

सामान्य प्रशासन विभागाकडून सार्वजनिक सुट्ट्यांची अधिसूचना काढण्यात आली आहे. २०२६ या वर्षातील पहिली सार्वजनिक सुट्टी २६ जानेवारी रोजी आहे. तर शेवटची सुट्टी २५ डिसेंबर रोजी असणार आहे. यात एक सुट्टी अतिरिक्त मिळणार आहे.




**महाराष्ट्रात २०२६ वर्षांमध्ये असणाऱ्या सार्वजनिक सुट्ट्यांची यादी**

प्रजासत्ताक दिन – २६ जानेवारी २०२६, सोमवार
महाशिवरात्री – १५ फेब्रुवारी २०२६, रविवार
छत्रपती शिवाजी महाराज जयंती – १९ फेब्रुवारी २०२६, गुरुवार
होळी (दुसरा दिवस) – ३ मार्च २०२६, मंगळवार
गुढीपाडवा – १९ मार्च २०२६, गुरुवार
रमझान ईद – २१ मार्च २०२६, शनिवार
रामनवमी – २६ मार्च २०२६, गुरुवार
महावीर जयंती – ३१ मार्च २०२६, मंगळवार
गुड फ्रायडे – ३ एप्रिल २०२६, शुक्रवार
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती – १४ एप्रिल २०२६, मंगळवार
महाराष्ट्र दिन – १ मे २०२६, शुक्रवार
बुद्ध पौर्णिमा – १ मे २०२६, शुक्रवार
बकरी ईद – २८ मे २०२६, गुरुवार
मोहरम – २६ जून २०२६, शुक्रवार
स्वातंत्र्य दिन – १५ ऑगस्ट २०२६, शनिवार
पारशी नववर्ष दिन – १५ ऑगस्ट २०२६, शनिवार
ईद ए मिलाद – २६ ऑगस्ट २०२६,बुधवार
गणेश चतुर्थी १४ सप्टेंबर २०२६, सोमवार
महात्मा गांधी जयंती –२ ऑक्टोबर, शुक्रवार
दसरा – २० ऑक्टोबर २०२६,मंगळवार
दिवाळी (लक्ष्मीपूजन) – ८ नोव्हेंबर २०२६, रविवार
दिवाळी (बलिप्रतिपदा) – १० नोव्हेंबर २०२६, मंगळवार
गुरुनानक जयंती २४ नोव्हेंबर २०२६, मंगळवार
ख्रिसमस – २५ डिसेंबर २०२६, शुक्रवार

### भाऊबीजेची अतिरिक्त सार्वजनिक सुट्टी

राज्य सरकारने भाऊबीजेला म्हणजे ११ नोव्हेंबर २०२६ रोजी अतिरिक्त सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. अतिरिक्त सुट्टी राज्य सरकारची शासकीय कार्यालये, राज्य शासनाचे उपक्रम, महापालिका, नगर परिषद, नगर पंचायत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्यासाठी जाहीर करण्यात आलेली आहे.

## विधीमंडळात ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये खुर्चीवरुन वाद

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्याच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष अपेक्षित असताना महाविकास आघाडीच्या तंबूतच खुर्चीवरून वाद सुरू आहे. विधीमंडळातील आसन व्यवस्थेवरून शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसच्या आमदारांमध्ये खटके उडाले. हा वाद इतका वाढला की, काँग्रेस आमदारांनी थेट विधानसभा अध्यक्षांची भेट घेतली. यानंतर ठाकरे गटाच्या पुढच्या रांगेतील दोन जाग कमी करून काँग्रेसला देण्यात आल्या. सभागृहातील पहिल्या काही रांगांमध्ये बसण्यासाठी दोन्ही गटांमध्ये वाद झाला. सभागृहामध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या २० आमदारांपैकी १४ आमदारांना पुढील रांगेत बसण्याची व्यवस्था आहे. तुलनेत काँग्रेसच्या १६ आमदारांपैकी फक्त ४ आमदारांना पुढे जागा दिली आहे. यामुळे काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदारांना ठाकरे गटाच्या नवीन आमदारांच्या मागे बसावे लागत होते.

यामुळे दोन्ही पक्षाच्या आमदारांमध्ये वाद होता. याबाबत ठाकरे गटाला बाजुला ठेवत काँग्रेसच्या आमदारांनी विधानसभा अध्यक्षांची भेट घेतली होती. संख्याबळ व ज्येष्ठतेनुसार काँग्रेसने पुढील जागांवर दावा केला. तर प्रथा परंपरेप्रमाणे ठाकरे गटाने पुढील जागांवर दावा केला होता. अखेर ठाकरे गटाला माघार घ्यावी लागली आणि त्यांच्या पुढील दोन जागा कमी करत काँग्रेसला देण्यात आल्या. पुढे बसण्यावरून काँग्रेसने घेतलेल्या पवित्र्यामुळे ठाकरे गटात नाराजी आहे.

## निलंगा निवडणूक काळात कामे सुरु:निवेदन सादर

### अनाधिकृत नाली कामे व डांबरीकरणावर त्वरित कारवाईची मागणी

**निलंगा/आयुब बागवान :** शहरातील निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू असतानाही काही अधिकाऱ्यांनी आणि संबंधित व्यक्तींनी अनधिकृत नाली बांधकाम व रस्त्याचे डांबरीकरण सुरू केले आहे. हा प्रकार मतदारांना प्रभावित करण्याच्या उद्देशाने आणि शासकीय आदेशांचा उघडपणे भंग करत करण्यात आला असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. अशूर खाना खाटिक गल्ली येथे अचानक नाली खोदकाम सुरू करण्यात आले. देवी मंदिर शिवाजीनगर अंडरग्राउंड ड्रेनेज प्रकल्पामुळे रस्त्यांवर बंदी असूनही डांबरीकरण करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे साळुंके कॉम्प्लेक्स बसस्टॉप समोर नव्याने नाली बांधकाम करण्यात येत आहे.

याबाबत काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला असून, संबंधित अधिकारी व व्यक्तींवर तात्काळ



कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, शासकीय निधीचा अपव्यय, मतदारांवर दबाव आणि आदेशाचा भंग हा गंभीर गुन्हा आहे. निवडणूक दरम्यान प्रशासनाने आचारसंहिता भंग रोखण्यासाठी त्वरित पावले उचलणे अत्यंत आवश्यक असल्याही मागणी करण्यात आली आहे

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया सन २०२५ उन्हाळी तीळ पिकाचे प्रमाणित बियाणे मिळणार १०० टक्के अनुदानावर

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया) हे खाद्यतेलांच्या आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत तेलबियांचे उत्पादन वाढविणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पिकाची उत्पादकता वाढ व सुधारित वाणांच्या प्रसारासाठी उन्हाळी हंगाम २०२५ करिता लातूर जिल्ह्यातील निवड केलेल्या लाभार्थ्यांना उन्हाळी तिळासाठी हेक्टरी अडीच किलो प्रमाणित बियाणे केंद्र शासनाच्या १०० टक्के अनुदानावर वितरीतकरण्यात येणार आहे.

यासाठी प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर व कमाल १ हेक्टर मर्यादित लाभ देय आहे. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांचा तिळासाठी ५०० ग्रॅम किंवा १ किलो याप्रमाणे पॅकिंगसाईज आहे. शेतक–यांना बियाणाच्या पॅकिंग साईजनुसार प्रमाणित बियाणे वितरीत करण्यात येईल. त्यामुळे क्षेत्रानुसार आवश्यक बियाण्यापेक्षा पॅकिंग साईज नुसार अधिकचे बियाणे परिगणित होत असल्यास यासाठीची रक्कम शेतकऱ्यांनी स्वहिश्याने भरावी लागेल. उन्हाळी तीळ पिकाच्या बियाण्याचा लाभ घेण्यासाठी http://mahadbt.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर प्रमाणित बियाणे वितरण, प्रात्याक्षिके, फ्लेक्झी घटक औषधे आणि खते या शीर्षकाअंतर्गत सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. १०० टक्के अनुदानावर प्रमणित बियाणे वितरण या घटकासाठी अर्ज सादर करण्यासाठी शेतकऱ्यांची ग्रीस्टॅकवर नोंदणी असणे बंधनकारक आहे. लाभार्थी निवड लक्षांकाच्या अधिन राहून प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर करण्यात येणार आहे. त्यामुळे या घटकासाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी अर्ज करावेत आणि लाभ घ्यावा असे आवाहन लातूर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



'झेब्रु शुभंकर' उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना वाहतूक साक्षर करण्याचा शासनाचा मानस...मुख्यमंत्री

## चिमटा दयाचा



वाढत्या थंडीचा फटका वयोवृध्द व बालकांना बसत आहे ! उपचारासाठी रूग्णालय फुल्ल दिसत आहेत !!

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे अनुदान तात्काळ जमा करा : डॉ. नरसिंह भिकाने

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे निलंगा तहसीलदारांना निवेदन




**निलंगा/प्रतिनिधी :** अतिवृष्टीमुळे मिळणारे शासकीय अनुदान अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्यामूळे शेतकरी अडचणीत आला असून ते तात्काळ जमा करण्यात यावे यासाठी मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी निलंगा तहसीलदार कुलकर्णी यांची भेट घेत शिष्टमंडळासहित रीतसर निवेदन ही दिले. निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मागील हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाच्या नियमांनुसार पंचनामे पूर्ण झाले असून अनुदान मिळण्यास शेतकरी पात्र आहेत. तरीसुद्धा आज दिनांक ९/१२/२०२५ पर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर कोणतेही अनुदान जमा झालेले नाही. या संदर्भात ग्रामसेवक/तलाठी यांच्याशी संपर्क साधला असता ते शेतकऱ्यांना उडवा-उडवीची उत्तरे देत आहेत.यामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे कारण शेतकऱ्यांच्या शेतीवर कर्ज, बियाणे, खते, पिक विमा प्रीमियम आणि दैनंदिन खर्च यांचा मोठा बोझा झाला असून, वेळेवर अनुदान न मिळाल्याने सावकार शेतकऱ्यांच्या गळ्याचा फास अवळतायत की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच प्रशासनाने अनुदान प्रकरणाची तात्काळ चौकशी करून विलंब का होत आहे याचा लेखाजोखा घेत,जिममेदर अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी व लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करावे.अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाभर चक्का जाम आंदोलन करेल असा इशाराही मनसे जिल्हाध्यक्ष डॉ भिकाने यांनी दिला आहे.यावेळी

तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार, सूरज पटेल, प्रदीप शेळके, विकास सूर्यवंशी, बालाजी पवार, सोमलिंग पाटील, गणेश उसनाळे, सदाशिव हाडोळे, शिवराज चिंचोळे, बालाजी खिचडे, नरसिंग महालिंग, महेश सावनगिरे, संतोष जाधव, शंकर चव्हाण, सुधीर चव्हाण आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## औसा मतदारसंघात 'अस्मिता भवन' उभारणीला गती

### आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

**औसा/प्रतिनिधी :** मतदारसंघातील महिलांना सुरक्षित, स्वतंत्र आणि हक्काची जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित 'अस्मिता भवन' प्रकल्पाला गती मिळत आहे. महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देणारा हा उपक्रम शासनाच्या अभिसरणातून मंजूर व्हावा यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थ आणि नियोजन मंत्री अजित पवार यांची भेट घेऊन सविस्तर पाठपुरावा केला.

पहिल्या टप्यात औसा मतदारसंघातील ९३ गावांमध्ये अस्मिता भवन उभारण्यासाठी अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मात्र या प्रकल्पासाठी आमदार निधी किंवा जिल्हा वार्षिक योजना निधी अनुज्ञेय नसल्यामुळे निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीवर उपाय शोधण्यासाठी हा पाठपुरावा करण्यात आला. आमदार अभिमन्यू पवार यांनी अभिसरणातून या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची विनंती उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे केली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या उपक्रमाचा सकारात्मक विचार करून पुढील दोन दिवसांत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्णय करण्याचे आश्वासन दिले. या चर्चेला मंत्री धनंजय मुंडेही उपस्थित होते.गावागावातील महिलांना आजही बचत गटांची बैठक घेण्यासाठी योग्य, सुरक्षित व स्वच्छ जागा उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती अधोरेखित करत आमदार पवार म्हणाले की, "औसा मतदारसंघातील प्रत्येक गावात अस्मिता भवन उभारण्याचा माझा संकल्प मी व्यवहारात आणणार आहे. महिला संघटनांना सशक्त व्यासपीठ मिळणे ही काळाची गरज आहे.

अस्मिता भवन उभारणीसाठी एकूण ४२ लाख रुपये खर्च अपेक्षित असून निधीची रचना



पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे .आमदार निधी : १० लाख रुपये,जिल्हा वार्षिक, योजना : १५ लाख रुपये,नरेगा अभिसरण : १७ लाख रुपये सुमारे २००० चौ.फुट क्षेत्रावर बांधल्या जाणाऱ्या अस्मिता भवनमध्ये ग्रामसंघ पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र कार्यालय, मोठा मीटिंग हॉल, बचत गटांच्या उत्पादन विक्रीसाठी दोन गाळे, स्वच्छतागृहे अशा सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध असणार आहेत.

अस्मिता भवन केवळ एक इमारत नसून गावातील महिलांच्या स्वावलंबन, संघटन आणि आर्थिक प्रगतीसाठी भक्कम पायाभूत सुविधा ठरेल, असा विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे. या निर्णयामुळे औसा मतदारसंघातील महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## 'वंदे-मातरम्' वरून रणकंदान नको

भारत देशात, आपलेच राष्ट्रीय गीत गाण्यास विरोध होत असेल तर यापेक्षा दुसरे कोणतेही दुर्दैव नाही. देश हा भारतीयांचा आहे. भारतीय हे देशप्रेमी आहेत. काहींच्या विचार हे देशविरोधी दिसून येतात. राष्ट्रगाण म्हणण्यात विरोध हा एक प्रकाराचा देशद्रोह नव्हे का? आपल्या देशात वंदेमातरम् म्हणण्यासाठी सर्वश्रेष्ठ लोकसभेत चर्चा होणे हे अतिषय दुर्दैव आहे. राष्ट्र प्रेम हे सर्वात असणे महत्त्वाचे आहे. वंदेमातरम म्हणण्याचा सर्वांचा पाठींबा असला पाहिजे. मतासाठी व कोणाच्यातरी समाजाच्या प्रेमापोटी चुकीचे चालत असेल तर ते योग्य नाही. एक ना एक दिवस भारतीय लॉर्ड मेकाले यांची प्रणाली झिटकारल्याशिवाय राहाणार नाही. भारतीय संस्कार, परंपरा व संस्कृती जगात श्रेष्ठ आहे हे मान्यच केले पाहिजे. भारतात ते आले कशासाठी तर लुटण्यासाठी आले. महमद गजणी असो किंवा वास्को द गामा असो. अनेक मुगलांनी देश लुटला आहे. मुगलांनी दिलेला त्रास हा कमी नव्हता. त्यात औरंगजेब पर्यंतचा इतिहास अभ्यासला जावा. निजामानी मराठवाड्यावर थोडा अन्याय केला नाही. नशीब चांगले निजामापासून भारतात विलीन होण्याचे भाग्य सरदार वल्लभभाई पटेल यांच्यामुळे मराठवाड्यातील जनतेला लाभले. पंडित नेहरू हे विदेश दौऱ्यावरत जाताच पोलीस ॲक्शन केले. हा इतिहास आहे. अनेकांनी अनुभवला आहे. सत्तरवर्ष झाली तरी राष्ट्रीय गीत म्हणण्यासाठी अधिवेशनात चर्चा करावी लागले हे सर्वात मोठे दु:ख आहे. भारतात अनेक विचारवंत झाले. अनेकांनी आपल्यापरिने समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. 'वंदेमातरम्' म्हणण्यासाठी चर्चा होणे व याला विरोध होत असेल तर आपण भारतीय आहोत का इतर देशात आहोत याची प्रचीती येणे स्वाभाविक आहे. ज्यावेळी स्वातंत्र्यवीर 'वंदेमातरम्' म्हणायाचे त्यावेळी ब्रिटीश हे चाबकाचे फटके मारत होते. अनेकांना जेवढ्यावेळी 'वंदेमातरम्' म्हणत तेवढ्यावेळी फटक्याची शिक्षा बेशुद्ध पडे पर्यत मारले जात होते. मुळात स्वातंत्र्यानंतर जे जन्मले किवा भारतीयाचा गौरवशाली इतिहास माहिती नाही. त्यांना 'वंदेमातरम्' ची किमया काय आहे. या राष्ट्रीय गीतामधील मतीतअर्थ काय आहे हे कळून येत नाही. 'वंदेमातरम्' म्हणयाचे नाही. याला विरोध करायाचा तर भारतात राहाण्याचा अधिकार नाही, आपण पाकिस्तानात नाहीत याची आठवण ठेवणे आवश्यक आहे. भारतातील लाखोंनी स्वराज्य मिळविण्यासाठी प्राणाची बाजी लावली. फासावर गेले. अनेक यातना जेलमध्ये भोगल्या. भारताचा इतिहास हा 'वंदेमातरम्' विरोध करणाऱ्यांनी अभ्यासला पाहिजे. भारता एवढी सुंदर संस्कृती जगात सापडणार नाही. याचे भान ठेवा. ज्या चुका झाल्या त्या मान्य केल्या पाहिजेत. 'वंदेमातरम्'ला विरोध कशासाठी? काही मंडळी 'वंदेमातरम्' चालू असताना मान-सन्मान न देता खुर्चीवर बसलेले दिसून आले आहेत. नको ते शब्द 'वंदेमातरम्' बाबत वापरतात. तरी राष्ट्रीय विचाराची मंडळी शांत राहातात. 'वंदेमातरम्'मधील अर्थ समजुन न घेता थेट विरोध होताना दिसून येतो आहे. विरोध कोण करीत आहे. नको शब्द कोण वापरत आहे. हे देशातील जनतेला दूरदर्शनाच्या माध्यमातून दिसून येत आहे. देशात या बाब चर्चा होत असताना प.बंगालच्या निवडणुकामुळे हा प्रकरण आहे असे मत व्यक्त केले. याचा अर्थ प.बंगाल मध्ये काही जर भारता विरोधात घडते आहे हे दिसून येते. तेथे काय परिस्थिती आहे. हे विरोधकांना माहिती आहे हे या विरोधावरून दिसून येत आहे. किमान आपण ज्या देशात राहातो. त्या देशातील जनतेनी भरपूर प्रेम दिले. सत्ता दिली. अफाट संपत्ती मिळवुन दिली. त्याच देशातील राष्ट्रीय विचाराच्या बाबीला हसू करीत आहात हे योग्य नाही. 'वंदेमातरम्' हे कोणत्याही एका पक्षाचे किंवा व्यक्तीचे गाण नाही. हे राष्ट्रीय गीत आहे. राष्ट्रीय प्रेरणादारी गीत आहे. स्फुर्ती देणारे आहे. देश स्वातंत्र्य होण्यापुर्वीपासूनचे आहे. असे असताना याला जाहिर विरोध केला जात आहे. जणू हे भारतीय नाही अशी प्रचिती दिसून येत आहे. विरोध कशासाठी? 'वंदेमातरम्'हे आजचे गीत नाही. कोण्याएका नेत्याचे नाही. मर्म, इतिहास व राष्ट्रीय बाबी विसरून वागत असाल तर ते योग्य नाही. त्यामुळे जनतेनी विचार केला पाहिजे. अशा विचाराच्या लोकांची देशाला गरज आहे का? कोणत्या कारणामुळे व कशासाठी 'वंदेमातरम्' ला विरोध दर्शवित आहात. काय नुकसान केले आहे. नुकसान विरोध करणाऱ्याचे आहे कारण त्यांना देशविरोधी विचारांच्या लोकांची मते मिळणार नाहीत. जे देशाविरोधात कार्यरत आहेत त्यांना काहिंचा पाठींबा मिळत आला आहे. मतासाठी साठी देशाचा विचार करीत नसाल तर ते योग्य नाही. आता पर्यंत चालत आले. देशात सर्वजन एकोप्याने जीवन जगत होते. विरोधकांना सुद्धा माहिती झाले की, आपला विरोध निरर्थक आहे. आपण भारतात रहातो. खातो, जीवीन जगतो. आपल्याला अनेक पद दिले. सर्व सुविधा घेत आहोत. मग विरोध कशासाठी तर काहींनी वाईट विचाराचे विष पेरत आहेत. त्यांच्या बहकावामुळे विरोध होत आहे. 'वंदेमातरम्'ला विरोध कशासाठी? काय नुकसान होणार नाही. त्यामुळे जे विरोधी विचाराचे आहेत त्यांनी शांत डोक्यांनी विचार करावा की. आपल्याला बदनाम करण्याचे षडयंत्र आहे. हा विरोध करणार समाज हा अशिक्षित व विकासापासून दूर रहावा असा समज असावा. मतासाठी राजकारण हे योग्य नाही. लोकशाहीत प्रत्येकाला विचार करून वागण्याची गरज आहे. एखाद्या राष्ट्रीय विचारावर मोठे वादंग निर्माण करून कोण देशविरोधी आहे हे देशातील जनतेला कळणार आहे. देशातील जनतेला कळाले पाहिजे की, कोण देशावर प्रेम करणारे आहेत. कोण विरोधी विचाराचे आहेत. 'वंदेमातरम्'ला विरोध म्हणजे देशाला विरोध आहे. याचे भान ठेवले पहिजे. सध्याला जे चालले आहे ते राष्ट्रीयत्वतेसाठी योग्य नाही. या देशात सर्वोच्च ठिकाणी 'वंदेमातरम्' बाबत चर्चा व विरोधी मत व्यक्त होत असेल तर सच्च्या भारतीयांना विचार करायाला लावणारी बाब आहे. आगामी काळात एकप्रकारे धोक्याची घंटा आहे. त्यामुळे सावध आतापासून झाले पाहिजे. नसता आगामी काळात मोठया संकटाची ही चाहूल आहे.

# सिंहावलोकन नववर्ष संकल्पनांचे

वर्ष नवे, हर्ष नवे म्हणत प्रारंभी अर्थात नववर्ष दिनी आखलेल्या योजना आणि केलेले संकल्प किती प्रत्यक्षात आले याचे सिंहावलोकन करण्याचा काळ म्हणजे सरता डिसेंबर महिना डिसेंबर महिन्याचा पहिला आठवडा देखील आता संपला आहे. त्यामुळे हे काम करायलाच हवे आणि सिंहावलोकन करताना स्वत:ला आरसा दाखवावा जवळपास केलेले संकल्प हे केवळ नव्याचे ९ दिवस म्हणत वर्षाच्या दुसऱ्या महिन्यापर्यंत टिकले नाही हे जाणवेल. ज्यांनी नेटाने संकल्प केले त्यांचे यानिमित्त विशेष अभिनंदन देखील करावेच लागेल.

बोलायला पैसे थोडेच लागतात म्हणत मोठ्या प्रमाणात संकल्प केले जातात ही आपली मानसिकता आहे. मात्र अंथरुण पाहून पाय पसरावेत या उक्तीप्रमाणे हे संकल्प होत नाही, म्हणून हे संकल्प टिकत नाहीत. आपल्या आरोग्यासाठी किमान रोज १० हजार पावलं चालायची हा संकल्प आणि याला कारण अर्थातच प्रत्येकाच्या हातात आलेले स्मार्ट वॉच आणि मोबाईल होय. यात आपण चाललेली पावलं मोजली जातात आणि त्याचा महिनावार आलेख ही जपला जातो. प्रत्यक्षात उद्दीष्ट किमान २ हजार पावलं असे सुरू करून पुढील प्रत्येक महिन्यात १ हजार पावलं वाढवली तर हे उद्दीष्ट आवाक्यात येऊ शकते.

कोरोना नंतर आलेल्या न्यू नॉर्मल ने आरोग्याचे खूप महत्व आहे याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला झाली. यामुळे मोठ्या प्रमाणावर जागरूकता आली असली तरी मनुष्य स्वभावाचा स्थायी भाव बदलत नाही. परिणामी ''जूने जाऊ द्या मरणालागुनी'' या उक्तीचा प्रत्यय येवून सर्वांचे न्यू नॉर्मल आता पुन्हा पहिले पाढे पंचावन्न या उक्तीवर येत आपण जुन्या सवयींकडे वळलो हे जाणवेल.

आजच्या धकाधकीच्या युगात आयुष्याची वृद्धी होण्यासाठी आरोग्य संपन्न राहण्याची गरज आहे. ताण-तणावापासून दूर राहण्याची गरज आहे, असे असताना आपण स्पर्धेत धावतोय यामुळे ढासळलाय याचा थेट परिणाम आपल्या जीवनशैलीवर आणि पर्यायाने आरोग्यावर झालेला आहे.

मोबाईलवर आरोग्यदायी पावलं मोजण्याचा संकल्प प्रत्यक्षात डोळ्यांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या रिल्स बघण्यात कधी बदलला हे कळलच नाही, ही वस्तुस्थिती आहे. रिल्स हा प्रकार तसा मनोरंजक असला तरी बघण्याचे भान आपले आहे. आपण किती काळ त्यासाठी देणार हे आपणच ठरवायच बघणारे मात्र भान हरपून बघत बसतात.

रिल्स बनविण्याचे आणि त्यातून पैसा कमावण्याचे वेड अतिशय भयानकत्यापायी जीव धोक्यात घालणारे आणि जिवाला मुकलेले यांची संख्या दिवसागणीक वाढत आहे.

कामाचा ताण कमी व्हावा यासाठी रिल्स बघणे हा उपाय नाही. कामाचा ताण कमी करण्यासाठी कामाचे व्यवस्थापन आणि वेळेचे नियोजन या दोन महत्वाच्या बाबी आहेत. काम करताना त्यांचा प्राधान्यक्रम ठरविणे ही सर्वात महत्वाची बाब आहे. प्राधान्यक्रम ठरवून कामाला वेळेत पूर्ण करण्याची सवय लावून घेतल्यास कामाचा ताण न येता काम केल्याचे समाधान मिळते.

आपण कोणत्या भूमिकेत आहोत आणि त्याची मागणी काय आहे याचा अभ्यास आणि सराव अभिनेते करीत असतात. सराव उत्तम झाल्यास सादरीकरण उत्तम होते. त्याच पद्धतीने कामाचा अभ्यास केला पाहिजे. प्राधान्यक्रमानुसार त्याला वेळ दिल्यास आपण काही कालावधीनंतर तेच काम सहजरित्या कमी वेळात पूर्ण करू शकतो. एकदा यात यश मिळाले की, आपोआप आत्मविश्वास वाढतो आणि कामाप्रती सकारात्मकता देखील वाढते.

दाखवणारे तक्ते आपणास मोबाईल मध्येच बघायला मिळतील. कोणत्या बाबीसाठी किती वेळ आपण दिला याचा आलेख मोबाईल ठेवतो. या सोशल मीडिया साठीचा काळ अधिक असेल तर आपले कामावरील लक्ष कमी होत आहे हे लक्षात घ्यावे.

कोणतेही तंत्रज्ञान नाण्यासारखे असते याला सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन बाजू असतात. मोबाईलच्या तंत्रज्ञानाने आपले संपर्काचे रुपांतर कार्यवृद्धीत करायला हवे मात्र त्याची दुसरी बाजू ही कामाची गती कमी करणारी आहे. मोबाईल संपर्काचे साधन आहे पण वाहन चालवताना मान वाकडी करून त्यावर संभाषण करण्याची तातडी नक्की आहे का ?, असे करून आपण धोका आमंत्रित करीत आहोत याचीही जाणीव आपण ठेवत नाही.

जय आणि विरू चा शोले आजही ताजा आहे. अद्याप त्यात जयचे नाणे दोन्हीकडून हेड्स दाखवते याचा खुलासा शेवटी होतो. आपण मोबाईलचा वापर तसा तर करीत नाही नाही हे या निमित्ताने आपण स्वत:ला विचारण्याची वेळ आता आली आहे.

कोरोना नंतरच्या न्यू नॉर्मल मध्ये नोकरी सोडण्याची एक मोठी लाट आयटी क्षेत्रात आली. कारण सर्वांना जगलं पाहिजे याचं भान आलं. मात्र आजही पिढी पुन्हा स्पर्धेत धावायला लागली आहे हे देखील तितकेच खरे आहे.

आता सिंहावलोकन करताना नवीन संकल्पांची तयारी देखील करा आणि येत्या नववर्ष दिनी साध्य असा संकल्प कराकरताय ना सुरुवात...!

**-प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

# फोनमधून केले ॲप अनइंस्टॉल तरीही शेअर केला जात आहे डेटा, ते अशाप्रकारे थांबवा

स्मार्टफोन वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काळजी वाटते की मोबाइल ॲप इन्स्टॉल केल्यानंतर हे ॲप प्रत्येक गोष्टीसाठी परवानगी मागतात. हे ॲप्स कॉन्टॅक्ट्स, मेसेज, गॅलरी आणि इतर अनेक परवानग्या घेतल्यानंतर काम करू लागतात. पण तुम्हाला माहिती आहे का की एकदा काम पूर्ण झाल्यावर, आम्ही फोनवरून हे ॲप्स अनइंस्टॉल केल्यानंतरही तुम्हाला या ॲप्सचा वापर करता येतो तुम्हाला धक्का बसला आहे, नाही का आणि जर असे असेल तर, ॲप आपल्या फोनचा डेटा ऍक्सेस करत आहे, हे कसे शोधायचे आणि आपण या ॲप्सवर डेटा जाण्यापासून कसे थांबवू शकतो. आज आम्ही तुम्हाला या महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देणार आहोत.

सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनच्या सेटिंगमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला सेटिंगमध्ये गुगल सर्च करावे लागेल, गुगल ऑप्शनवर क्लिक केल्यानंतर मॅनेज युवर गुगल अकाउंटवर क्लिक करावे लागेल.

तुमचे उददुत खाते व्यवस्थापित करा वर क्लिक केल्यानंतर, तुम्हाला डेटा आणि गोपनीयता पर्यायावर टॅप करावे लागेल. या पर्यायावर क्लिक केल्यानंतर, थर्ड पार्टी ॲप्स आणि सर्व्हिसेस हा पर्याय तुम्हाला थोडा खाली स्क्रोल करून दिसेल.

तुम्हाला थर्ड पार्टी ॲप्स आणि सर्व्हिसेसच्या या पर्यायावर क्लिक करावे लागेल, तुम्ही या पर्यायावर क्लिक करताच, तुमच्या फोनमध्ये सध्या असलेल्या ॲप्सची यादी तुमच्यासमोर उघडेल आणि त्यासोबत ते ॲप्स देखील असतील. तुम्ही तुमच्या फोनवर कोणता वापरत आहात ते तुम्हाला दाखवले आहे.

तुम्हाला त्या ॲप्सच्या नावांवर क्लिक करावे लागेल, जे तुम्ही फोनवरून अनइंस्टॉल केले आहेत. तुम्ही त्या ॲपच्या नावावर क्लिक करताच, तुम्हाला असे लिहिलेले दिसेल की तुम्हाला अजूनही ॲपमध्ये काही प्रवेश आहे, याशिवाय तुम्हाला एक पर्याय दिसेल ज्यामध्ये असे लिहिलेले असेल की तुम्ही तुमचे सर्व कनेक्शन हटवू शकता. या पर्यायावर क्लिक करून, तुम्ही तुमच्या फोनवरून काढलेल्या प्रत्येक ॲपसह तुमचे कनेक्शन हटवावे लागेल.

# जिल्ह्यातील सर्व गावांचे २०० मीटर परिघीय क्षेत्र 'डीम्ड एनए'

**लेखन - सचिन अडसूळ**

शासनच्या निर्णयाची अंमलबजावणी करणारा कोल्हापूर राज्यात पहिला जिल्हा

महाराष्ट्र शासनाने सुधारणा केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करीत कोल्हापूर जिल्ह्यातील ३ लाख जमीन मालकांना थेट फायदा होणार आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारा आणि साम ान्य माणसाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला हात घालणारा एक ऐतिहासिक निर्णय कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्षात आणला आहे. महसूल विभागाच्या धडक मोहिमेअंतर्गत राज्यातील पहिलाच प्रयोग राबवत कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल १,२०० गावांमधील ६० हजार गट नंबर (सर्व्हे नंबर) आता 'डीम्ड एनए' (मानीव अकृषिक) म्हणून घोषित करण्यात आले आहेत. सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील सुमारे ३ लाख नागरिकांना याचा थेट आणि तत्काळ फायदा मिळणार आहे. या निर्णयामुळे केवळ कागदपत्रांचा प्रवासच थांबला नाही, तर कोल्हापूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि गृहनिर्माण क्षेत्राला मोठी गती मिळणार आहे.

काय आहे हा ऐतिहासिक निर्णय?

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ आणि २०२२ च्या शासन परिपत्रकानुसार, गावठाणाच्या हद्दीपासून २०० मीटरच्या परिघीय क्षेत्रातील जमिनी अकृषिक (ऱअ) समजल्या जाव्यात, असे स्पष्ट निर्देश होते. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नव्हती. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या जनहितकारी निर्णयाला मूर्त स्वरूप दिले. अवघ्या काही दिवसांत युद्धपातळीवर काम करून प्रशासनाने १,२०० गावांमधील गावठाणालगतच्या जमिनींचे सर्वेक्षण केले. यात रहिवासी, वाणिज्य आणि औद्योगिक वापरास योग्य असलेल्या २०० मीटरच्या परिघातील जमिनी निश्चित करून ६० हजार गट नंबरच्या याद्या तयार केल्या आहेत. या याद्या आता तहसीलदारांकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत.

अर्ज न करता मिळणार सनद

गावाकडच्या माणसाला घरासाठी किंवा व्यवसायासाठी आपली जमीन 'एनए' (अकृषिक) करायची म्हटले की, सरकारी कार्यालयांत येजा करावी लागत असत. नगररचना विभाग, महसूल विभाग आणि इतर अनेक विभागांचे 'ना हरकत दाखले' मिळवण्यात नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जात असे. मात्र, कोल्हापूर पॅटर्नने ही सर्व कटकट संपवली आहे. आता नागरिकांना जमिनीच्या अकृषिक दर्जासाठी कोणत्याही कार्यालयात अर्ज करण्याची गरज नाही. नगररचना विभागाच्या स्वतंत्र अभिप्रायाची आवश्यकता नाही, की मोजणी शुल्क भरण्याची सक्ती नाही. प्रशासन स्वत:हून आपल्या दारी येणार आहे. तयार करण्यात आलेल्या यादीनुसार तलाठी गावोगावी नोटीस देऊन संबंधित जमीनधारकांना माहिती देतील. त्यानंतर तहसील कार्यालयामार्फत अकृषिक आकाराचे चलन पाठवले जाईल. जम ीनधारकाने शासनाचा अकृषिक सारा आणि रूपांतरित कर भरला की, तहसीलदार तत्काळ 'अकृषिक सनद' प्रदान करतील. इतकी सुलभ आणि पारदर्शक प्रक्रिया राबवणारे कोल्हापूर हे राज्यातील पहिले जिल्हा ठरले आहे.

गावस्तरावर होणारे दूरगामी आणि क्रांतिकारक फायदे

या निर्णयाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम हा गावपातळीवर दिसून येणार आहे. 'डीम्ड एनए'च्या या निर्णयामुळे ग्रामीण भागाचे चित्र कसे पालटणार आहे, हे खालील मुद्द्यांवरून स्पष्ट होते:

१. घरांचे स्वप्न होणार पूर्ण : ग्राम ीण भागात गावठाणाबाहेर घर बांधताना कायदेशीर अडचणी येत होत्या. आता गावठाणापासून २०० मीटरच्या आतील जमिनी अधिकृतपणे अकृषिक झाल्यामुळे ग्रामस्थांना कायदेशीररीत्या पक्की घरे बांधता येतील. अनधिकृत बांधकामाचा शिक्का पुसला जाईल.

२. कर्ज मिळणे झाले सोपे : जोपर्यंत जमिनीला 'एनए'चा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत बँका आणि वित्तीय संस्था गृहकर्ज किंवा व्यवसायासाठी कर्ज देत नाहीत. आता थेट अकृषिक सनद मिळणार असल्याने बँकांचे दरवाजे शेतकऱ्यांसाठी आणि ग्रामस्थांसाठी खुले होतील. यामुळे गावातच भांडवल उभे राहून विकासाला चालना मिळेल.

३. बांधकाम व्यवसायाला चालना : कर्ज उपलब्ध झाल्यामुळे आणि जमिनीची कागदपत्रे क्लियर झाल्यामुळे गावात नवीन बांधकामे सुरू होतील. यातून स्थानिक गवंडी, मजूर, हार्डवेअर विक्रेते आणि सिमेंट-लोखंड व्यापाऱ्यांना मोठा रोजगार मिळेल. एकप्रकारे ग्रामीण अर्थचक्राला यामुळे गती मिळणार आहे.

४. फसवणुकीला आळा आणि पारदर्शकता : अनेकदा जमिनीच्या व्यवहारात ती जमीन अकृषिक आहे की नाही, यावरून फसवणुकीचे प्रकार घडत असत. आता प्रशासनानेच अधिकृत याद्या जाहीर केल्यामुळे आणि मालमत्ता पत्रिकेवर तशा नोंदी होणार असल्याने जमिनीचे व्यवहार अत्यंत पारदर्शक होतील. खरेदी-विक्री करताना ग्राहकांची फसवणूक टळेल.

५. वेळ आणि पैशाची बचत : पूर्वी एनए ऑर्डर मिळवण्यासाठी एजंटची म ध्यस्थी, कार्यालयात हेलपाटे मारणे यात सर्वसामान्यांचे लाखो रुपये खर्च होत. आता 'विना अर्ज' आणि 'विना शुल्क म ोजणी' या तत्त्वामुळे शेतकऱ्यांच्या पैशाची मोठी बचत होणार आहे.

प्रशासकीय गतिमानतेचे उत्तम उदाहरण

पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या हस्तेच संबंधित तालुक्यांच्या तहसीलदारांकडे याद्या सुपूर्द करण्यात आल्या आहेत. महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभागाने ज्या तत्परतेने हे काम पूर्ण केले, ते वाखाणण्याजोगे आहे. या मोहिमेमुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या नियोजित विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

थोडक्यात सांगायचे तर, केवळ महसूल गोळा करणे हा या निर्णयाचा उद्देश नसून, सामान्य माणसाला सन्मानाने जगण्याचा हक्क देणे, हा यामागचा मूळ विचार आहे. कोल्हापूरकरांसाठी हा निर्णय खऱ्या अर्थाने आनंद देणारा ठरला असून, येत्या काळात जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विकासाची नवी गंगा अवतरलेली दिसेल, यात शंका नाही. आता या शासनाच्या निर्णयाची कोल्हापूर जिल्ह्यातील अंमलबजावणी पथदर्शी काम म्हणून राज्यभर स्विकारली जाईल.

## पाय ठेवायलाही जागा नाही चीनच्या ग्रेट वॉलला का म्हणतात जगातील सर्वात लांब स्मशानभूमी

गर्दीने खचाखच भरलेल्या चीनच्या ग्रेट वॉलचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. चीनची ही महान भिंत जगातील सात आश्चर्यांपैकी एक आहे. व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये २१ फूट रुंद भिंतीवर पाय ठेवायलाही जागा नाही. या फोटोमुळे १६व्या शतकातील जुन्या भिंतीच्या संवर्धनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चीनच्या ग्रेट वॉलला जगातील सर्वात लांब स्मशानभूमी का म्हटले जाते आणि एका महिलेच्या रडण्यामुळे चीनची ग्रेट वॉल कशी कोसळली ते जाणून घेऊया.

चीनच्या ग्रेट वॉलची संकल्पना चीनचा पहिला सम्राट किन शी हुआंग याने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात केली होती. पण ते पूर्ण व्हायला शेकडो वर्षे लागली. सुरक्षेच्या कारणास्तव वेगवेगळ्या राजांनी आपापल्या काळात भिंतीचा विस्तार केला. १६ व्या शतकापर्यंत ही भिंत सुमारे २१ किलोमीटरपर्यंत वाढली.

चीनच्या ग्रेट वॉलची लांबी २१,१९६.१८ किलोमीटर आणि उंची ८-३५ फूट आहे. असे मानले जाते की या भिंतीची रुंदी इतकी आहे की सुमारे ५ घोडेस्वार किंवा १० पायदळ एकाच वेळी गस्त घालू शकतात. ही रचना किती वाढली आहे, याचा अंदाज यावरून लावता येतो की, मानवाने बनवलेली ही जगातील एकमेव अशी रचना आहे, जी चंद्रावरूनही दिसू शकते.

चीनची ग्रेट वॉल स्थानिक लोक 'वान ली चांग चेंग' या नावाने ओळखतात. याचा अर्थ 'दहा हजार ली लांब भिंत' असा होतो. ली हे लांबी मोजण्याचे चीनी एकक आहे. दहा हजार ली म्हणजे अंदाजे १० हजार किलोमीटर. सुमारे ५० वर्षापूर्वी १९७० मध्ये ही भिंत सर्वसामान्यांसाठी खुली करण्यात आली होती. १९८७ मध्ये, ही भिंत युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून सूचीबद्ध केली होती.चीनची ग्रेट वॉल बांधताना अनेकांना जीव गमवावा लागला. संपूर्ण भिंत हातांनी बनविली आहे. अहवालानुसार, सम्राटाचे सैनिक सामान्य लोकांना घेरायचे आणि त्यांना भिंतीवर काम करायला लावायचे. हजारो लोक रात्रंदिवस भिंत बांधण्यात व्यस्त असायचे. कोणत्याही मजुराने पळून जाण्याचा प्रयत्न केला किंवा तक्रारही केली, तर त्याला तेथे जिवंत गाडले जात असल्याचे सांगितले जाते. जर कामगार योग्यरित्या काम करू शकत नसेल, तर त्याचे परिणाम सारखेच असायचे. पुरातत्वशास्त्रज्ञांना भिंतीच्या काही भागाखाली मानवी अवशेषही सापडले आहेत.

एका आकडेवारीनुसार सुमारे २ हजार वर्षाच्या बांधकाम ादरम्यान ४,००,००० ते १०,००,००० लोक मरण पावले. हे लोक भिंतीच्या बाजूला किंवा भिंतीच्या आतच गाडले गेले. या कारणास्तव, चीनच्या महान भिंतीला इतिहासातील सर्वात लांब स्मशानभूमी म्हटले जाते.साधारणपणे भिंत सरळ केली जाते. पण चीनची ग्रेट वॉल अगदी नागमोडी आहे. काही लोक त्याच्या डिझाइनची तुलना ड्रॅगनशी करतात. त्याच वेळी, चिनी समजानुसार, एका ड्रॅगनने भिंतीचा मार्ग दाखवला होता. काम गारांनी अजगराचा पाठलाग केला आणि त्यानुसार भिंतीचे काम सुरू ठेवले.

चिनी पुराणकथांनुसार, चीनची ग्रेट वॉल एका अपूर्ण प्रेम कथेची साक्षीदार आहे. खरं तर, मेंग जियांग नावाच्या महिलेच्या पतीला देखील चिन राजवंशाचा पहिला सम्राट (२२१ इउ-२०७ इउ) शी हुआंग-ती यांच्या आदेशानुसार महान भिंत बांधण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या लग्नाला तीनच दिवस झाले होते.आठवडे लवकरच महिन्यांत बदलले आणि हिवाळा आला. तिच्या पतीकडून बराच वेळ ऐकले नाही, पत्नी तिच्या पतीला भेटण्यासाठी आणि त्याला हाताने बनवलेले हिवाळ्यातील उबदार कपडे देण्यासाठी ग्रेट वॉलवर गेली. पण तिथे पोहोचल्यावर तिला बातमी मिळाली की काम करत असतानाच पतीचा मृत्यू झाला. तो भिंतीखाली कुठेतरी गाडला गेला आहे.

पतीच्या निधनाने दु:खी झालेली मेंग जियांग तीन दिवस आणि तीन रात्री भिंतीवर रडत राहिली. असे म्हटले जाते की तिच्या अश्रूंमुळे शक्तिशाली भिंतीचा एक भाग कोसळला आणि तिच्या पतीचे अवशेष उघड झाले. लेडी मेंग जियांगची कथा चीनमधील सर्वात प्रसिद्ध लोककथांमध्ये गणली जाते.

## रोज सकाळी रिकाम्या पोटी प्या आवळ्याचा रस, आरोग्याला मिळतील जबरदस्त फायदे

पोषक तत्वांनी समृद्ध असलेला आवळा आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानला जातो. आणि नैसर्गिकरित्या आरोग्य समस्या दूर करण्यास मदत करतो. आवळ्यामध्ये भरपूर जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, जी आपल्याला अनेक रोगांपासून वाचवतात.

तुम्ही तुमच्या आहारात आवळ्याचा रस समाविष्ट करू शकता. त्यात असलेले व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. ज्यामुळे तुम्हाला सर्दी-खोकला आणि इतर अनेक समस्या टाळण्यास मदत होते. परंतु, रिकाम्या पोटी आवळ्याचा रस पिणे आपल्या आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर आहे. तर आवळ्याचा रस पिण्याचे फायदे जाणून घेऊया.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते-**

व्हिटॅमिन सी ने समृद्ध आवळ्याचा रस रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतो. ज्यामुळे तुमचे जीवाणू आणि विषाणूजन्य संसर्गांपासून संरक्षण होते. शिवाय, व्हिटॅमिन सी अनेक रोगांचा धोका कमी करण्यास देखील मदत करते.

**दृष्टी सुधारण्यास मदत करते-**

तुम्हाला माहिती असेलच की, आवळा दृष्टी सुधारण्यासाठी खूप चांगला आहे. आवळ्यामध्ये कॅरोटीन असते, जे डोळ्यांसाठी चांगले मानले जाते. दररोज रिकाम्या पोटी आवळ्याचा रस प्यायल्याने मोतीबिंदू, जळजळ आणि डोळ्यांतून पाणी येणे यासारख्या समस्या टाळता येतात.

**वजन कमी करते-**

वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी आवळ्याचा रस एक वरदान आहे. त्यात अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. जे पचनसंस्था सुधारण्यास मदत करतात. हा रस प्यायल्याने चयापचय देखील वाढतो. ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**हाडांसाठी फायदेशीर-**

शरीरात कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडांशी संबंधित समस्या उद्भवतात. या व्हिटॅमिनच्या कमतरतेवर मात करण्यासाठी, तुम्ही तुमच्या आहारात आवळ्याचा रस समाविष्ट करू शकता.

**कोलेस्ट्रॉल नियंत्रित करते-**

शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्याने हृदयरोगाचा धोका वाढतो. आवळ्याच्या रसात फॅटी ॲसिड, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक घटक असतात जे कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात.

**शरीराला ऊर्जा देते-**

आवळ्याचा रस एनर्जी ड्रिंक म्हणून काम करतो. जर तुम्ही ते दररोज प्यायले तर तुम्हाला दिवसभर ऊर्जावान वाटेल. ते तुमचे शरीर तंदुरुस्त ठेवण्यास मदत करते.



# मध्य रेल्वेकडून नाताळ आणि नवीन वर्षासाठी ७६ हिवाळी विशेष सेवा

**मुंबई/प्रतिनिधी** :नाताळ, नववर्ष तसेच हिवाळी सुट्ट्यांमध्ये वाढणारी प्रवासी गर्दी लक्षात घेता, मध्य रेल्वेने अतिरिक्त प्रवासी मागणी पूर्ण करण्यासाठी एकूण ७६ हिवाळी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या मुंबईकरमळी / नागपूर / मंगळुरू / तिरुवनंतपुरम तसेच पुणेनागपूर / अमरावती /सांगानेर दरम्यान चालविण्यात येणार आहे. तपशील पुढील प्रमाणे:




१. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस करमळी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दैनिक विशेष (एकूण ३६ सेवा) ०११५१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस करमळी दैनिक विशेष. गाडी क्र. ०११५१ ही दैनिक विशेष गाडी दि. १९.१२.२०२५ ते ०५.०१.२०२६ या कालावधीत दररोज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि करमळी येथे त्याच दिवशी १३.३० वाजता पोहोचेल. (१८ सेवा)

०११५२ करमळी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दैनिक विशेष. गाडी क्र. ०११५२ ही दैनिक विशेष गाडी १९.१२.२०२५ ते ०५.०१.२०२६ या कालावधीत दररोज करमळी येथून १४.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पुढील दिवशी ०३. ४५ वाजता पोहोचेल. (१८ सेवा)

थांबे: दादर, ठाणे, पनवेल, पेन, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि थीवी.

संरचना: दोन वातानुकुलीत द्वितीय, ८ वातानुकुलीत तृतीय, ६ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

२.लोकमान्य टिळक टर्मिनस तिरुवनंतपुरम उत्तर लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (एकूण ८ सेवा)

०११७१ लोकमान्य टिळक टर्मिनस तिरुवनंतपुरम उत्तर साप्ताहिक विशेष गाडी क्र. ०११७१ ही साप्ताहिक विशेष गाडी १८.१२.२०२५ ते ०८.०१.२०२६ या कालावधीत प्रत्येक गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १६.०० वाजता सुटेल आणि तिरुवनंतपुरम उत्तर येथे दुसऱ्या दिवशी २३.३० वाजता पोहोचेल. (४ सेवा)

०११७२ तिरुवनंतपुरम उत्तर लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडी क्र. ०११७२ ही साप्ताहिक विशेष गाडी २०.१२.२०२५ ते १०.०१.२०२६ या कालावधीत प्रत्येक शनिवारी तिरुवनंतपुरम उत्तर येथून १६.२० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे तिसऱ्या दिवशी ०१.०० वाजता पोहोचेल. (४ सेवा)

थांबे: ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थीवी, करमळी, मडगांव जंक्शन, कारवार, गोकर्ण रोड, कुमटा, मुरुडेश्वर, भटकल, मूकांबिका रोड बैदूर, कोंडापूर, उडुपी, सुरतकल, मंगळुरू जंक्शन, कासरगोड, कन्नूर, कोषीकोड, तिरूर, षोरनूर, त्रिशूर, आलुवा, एर्नाकुलम टाउन,कोट्टायम, चंगानस्सरी, तिरुवल्ला, चेंगन्नूर, मावेलिकारा, कायमीकुलम, करुनागप्पल्ली, सस्तमकोट्टा, कोल्लम आणि वर्कला शिवगिरी.

संरचना: एक वातानुकूलीत द्वितीय, ६ वातानुकूलीत, ९ शयनयान, ४ सामान्य द्वितीय, १ सामान्य द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅन.

३. लोकमान्य टिळक टर्मिनस मंगळुरू जंक्शन लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (८ सेवा) ०११८५ लोकमान्य टिळक टर्मिनस मंगळुरू जंक्शन साप्ताहिक विशेष.

गाडी क्र. ०११८५ ही साप्ताहिक विशेष गाडी १६.१२.२०२५ ते ०६.०१.२०२६ या कालावधीत प्रत्येक मंगळवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १६.०० वाजता सुटेल आणि मंगळुरू जंक्शन येथे दुसऱ्या दिवशी १०.०५ वाजता पोहोचेल. (४ सेवा) ०११८६ मंगळुरू जंक्शन लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडी क्र. ०११८६ ही साप्ताहिक विशेष गाडी १७.१२.२०२५ ते ०७.०१.२०२६ या कालावधीत प्रत्येक बुधवारी मंगळुरू जंक्शन येथून १३.०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०६.५० वाजता पोहोचेल. (४ सेवा)

थांबे: ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थीवी, करमळी, मडगांव जंक्शन, कारवार, गोकर्ण रोड, कुमटा, मुरुडेश्वर, भटकल, मुकांबिका रोड बैदूर, कुंडापूर, उडुपी आणि सुरथकल.

संरचना: एक वातानुकूलि प्रथम, ३ वातानुकूलित द्वितीय, १५ वातानुकूलित तृतीय, १ पँट्री कार, १ सामान्य द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि २ जनरेटर व्हॅन्स.

४. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस साप्ताहिक विशेष (६ सेवा)

०१००५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर साप्ताहिक विशेष. गाडी क्र. ०१००५ ही साप्ताहिक विशेष गाडी २०.१२.२०२५ ते ०३.०१.२०२६ या कालावधीत प्रत्येक शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. (३ सेवा)

०१००६ नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस साप्ताहिक विशेष. गाडी क्र. ०१००६ ही साप्ताहिक विशेष गाडी २०.१२.२०२५ ते ०३.०१.२०२६ या कालावधीत प्रत्येक शनिवारी नागपूर येथून १८.१० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०८.२५ वाजता पोहोचेल. (३ सेवा)

थांबे: दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा.

संरचना: दोन वातानुकूलित द्वितीय, ८ वातानुकूलित तृतीय, ६ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन.

५. पुणे नागपूर पुणे साप्ताहिक विशेष गाड्या (एकूण ६ सेवा) ०१४०१ पुणे नागपूर साप्ताहिक विशेष. गाडी क्र. ०१४०१ ही साप्ताहिक विशेष गाडी १९.१२.२०२५ ते ०२.०१.२०२६ या कालावधीत दर शुक्रवारी पुणे येथून २०.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १४.०५ वाजता पोहोचेल. (३ सेवा)

०१४०२ नागपूर पुणे साप्ताहिक विशेष. गाडी क्र. ०१४०२ ही साप्ताहिक विशेष गाडी २०.१२.२०२५ ते ०३.०१.२०२६ या कालावधीत दर शनिवारी नागपूर येथून १६.१० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी ११.४५ वाजता पोहोचेल. (३ सेवा)

थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धमनगाव आणि वर्धा. संरचना: चार वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन.

६. पुणे सांगानेर पुणे साप्ताहिक सुपरफास्ट विशेष (६ सेवा)

०१४०५ पुणेसांगानेर साप्ताहिक सुपरफास्ट विशेष. गाडी क्रमांक ०१४०५ ही साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाडी १९. १२.२०२५ ते ०२. ०१. २०२६ या कालावधीत दर शुक्रवारी पुणे स्थानकातून ०९.४५ वाजता सुटेल आणि सांगानेर येथे दुसऱ्या दिवशी ०६.४५ वाजता पोहोचेल. (एकूण ३ सेवा) ०१४०६ सांगानेरपुणे साप्ताहिक सुपरफास्ट विशेष. गाडी क्रमांक ०१४०६ ही साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाडी २०. १२.२०२५ ते ०३.०१.२०२६ या कालावधीत दर शनिवारी सांगानेर स्थानकातून ११.३५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०९.३० वाजता पुणे येथे पोहोचेल. (एकूण ३ सेवा)

थांबे: लोणावळा, कल्याण, भिवंडी रोड, वसई रोड, पालघर, वापी, वलसाड, सुरत, अंकलेश्वर, वडोदरा, रतलाम, भवानी मंडी, रामगंज मंडी, कोटा आणि सवाई माधोपुर.

संरचना: चार वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन.

७. पुणे अमरावती पुणे साप्ताहिक विशेष गाड्या (६ सेवा) ०१४०३ पुणेअमरावती साप्ताहिक विशेष गाडी क्रमांक ०१४०३ ही साप्ताहिक विशेष गाडी २०.१२.२०२५ ते ०३.०१.२०२६ या कालावधीत दर शनिवारी पुणे स्थानकातून १९.५५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०९.२५ वाजता अमरावती येथे पोहोचेल. (एकूण ३ सेवा)

०१४०४ अमरावती पुणे साप्ताहिक विशेष गाडी क्रमांक ०१४०४ ही साप्ताहिक विशेष गाडी २१.१२.२०२५ ते ०४.०१.२०२६ या कालावधीत दर रविवारी अमरावती येथून १२.०० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी ००.१५ वाजता पोहोचेल. (एकूण ३ सेवा)

थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर आणि बडनेरा.

संरचना: चार वातानुकुलीत तृतीय, ७ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन.

आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०१४०३ आणि ०१४०४ यांचे आरक्षण १०.१२.२०२५ पासून सुरू होईल आणि विशेष गाडी क्रमांक ०११५१, ०११७१, ०११८५, ०१००५, ०१००६, ०१४०१, ०१४०२ आणि ०१४०५ यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू आहे. सुपरफास्ट मेल / एक्सप्रेस गाड्यांसाठी लागू असलेल्या अनारक्षित निवासस्थानासाठी सामान्य शुल्कासह अनारक्षित कोचसाठी तिकिटे यूटीएस द्वारे बुक करता येतात. या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## १३ डिसेंबरपासून लातूरमार्गे पंढरपूर - तिरुपती साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार : निलेगांवकर

**लातूर/प्रतिनिधी** : येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ पासून पंढरपूर- तिरुपती व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

पंढरपूरमार्गे तिरुपती रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दि. १० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे पंढरपूर - तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०१३ ही तिरुपती पंढरपूर - तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून ही गाडी सुरु होणार आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल.ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदरमार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०१३ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ६ एसी थ्री टिअर , ९ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २३ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. १३ डिसेंबर ते दि. २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले. याशिवाय या बैठकीत हरंगुळ रेल्वे स्थानकाची प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, लातूर - पुणे - खडकी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरु करणे आदी विषयांवरही महत्वपूर्ण चर्च झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली.

## पदवीधर मतदार संघ मतदार यादीमध्ये १८ डिसेंबरपर्यंत नाव नोंदविता येणार, दावे व हरकती दाखल करण्यासाठी १८ डिसेंबरपर्यंत मुदत

**लातूर/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आओग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदान याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार ६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत नमुना १८ प्राप्त झालेले अर्जांची प्रारूप यादी ३ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीवर १८ डिसेंबर २०२५ पर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत.

दावे व हरकती दाखल करताना नमुना अर्ज ७ व ८ मध्ये हरकती दाखल करता येतील. तसेच मतदार यादीमध्ये नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी १८ डिसेंबर पर्यंत नमुना अर्ज १८ ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने सादर करता येणार आहे. नमुना अर्ज १८ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी https://www.mahaelection.gov.in/citizen/login लिंकचा वापर करावा. त्या अनुषंगाने ०५- औरंगाबाद विभाग पदवीधर मतदर संघाकरिता नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीत नाव समावेश करण्यासाठी लातूर तालुक्यातील सर्वसाधारण रहिवास असलेल्या सर्व पदवीधारकांनी नमुना अर्ज ७ व ८ मध्ये दावे व हरकती मतदान केंद्रनिहाय नियुक्त पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत. तसेच मतदार यादीत नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना अर्ज १८ भरून पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत, असे लातूरच्या उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे व लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी कळविले आहे.

# तुकडेबंदी सुधारणा कायदा ग्रामीण भागातही उपयुक्त ठरावा

## ❑ लातूरससह नजीकच्या गावातील कबाल्याचे प्रश्न मार्गी लागावेत

## ❑ गरीबांचे घरांचे स्वप्न साकार व्हावे - माजी मंत्री, आमदार अमित देशमुख

**नागपूर/प्रतिनिधी** : राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सभागृहात दाखल करण्यात आलेल्या सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ - महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्या बाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत सुधारणा विधेयकावर चर्चा करताना तुकडेबंदी सुधारणा कायदा ग्रामीण भागातही उपयुक्त ठरावा लातूरससह नजीकच्या गावातील कबाल्याचे प्रश्न मार्गी लागावेत आणि यातून गरीबांचे घरांचे स्वप्न साकार व्हावे, अशी आग्रही मागणी आमदार देशमुख यांनी सभागृहात केली.

सरकारच्या अपयशावर बोट या विधेयकावर बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, आज हे विधेयक चर्चेला आले असून या विधेयकामुळे ६० लाख घरे आणि १ कोटी २० लाख नागरिकांना फायदा होईल, असे मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले. आपण जो आज धारण जमिनी तुकडे प्रतिबंध करणारा कायदा काही सुधारणा करून आणत आहात, हे पाहता यात सरकार व प्रशासनाचे अपयश आहे असे म्हणले तर चुकीचे होणार नाही.

यातून आपण सामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी हा कायदा आणत आहेत. कायद्याची घोषणा झाल्यानंतर काहीजण नव्याने जमिनीचे तुकडे पाडण्यास सुरुवात करतील आणि असे करीत असतील तर या कायद्यामुळे त्यांना संरक्षण मिळाले तर याचा फायदा म्हणावा तसा होणार नाही. राज्य सरकारने जो युडीसीपीआर स्वीकारला आहे तरीही काही ठिकाणी या कायद्यामुळे अडचणी निर्माण होतील. हा कायदा आणला तरी गरजुना याचा फारसा उपयोग होईल की नाही हे आत्ताच सांगता येणार नाही असे ते म्हणाले.

ग्रामीण व गावठाण भागाचा मुद्दा

आमदार देशमुख यांनी ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ते म्हणाले, राज्यात अनेक ठिकाणी ग्रामपंचायत हद्दीत अतिक्रमण झाले आहे, अनेकांनी घरे केली आहेत. अशा ग्रामीण भागातील त्या कालावधीतील गरजू नागरिकांना या कायद्याचा फायदा व्हायला हवा.

लातूरमधील कबाल्याचा प्रश्न:

लातूरमध्ये सुद्धा अनेकजण असे आहेत की, ज्यांना अद्याप कबाले मिळाले नाहीत. अनेक जागा महसूल विभागाच्या आहेत, इतर विभागाच्या देखील आहेत, ज्यामुळे गेली अनेक वर्षे ते नागरिक त्रस्त आहेत. तेव्हा अशा रहिवाशांना देखील या कायद्याच्या माध्यमातून फायदा व्हावा यासाठी प्रयत्न व्हावेत. असे सांगून आपण हा कायदा नागरी भागासाठी आणत आहात. हे आणताना ग्रामीण भागातील व गावठाण जागेतील नागरिकांना या कायद्यामुळे कसा फायदा होईल याचा विचार सरकारने करावा असे ते म्हणाले.

या कायदया संदर्भात सभागृह सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुददयावर बोलतांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या कायद्यामुळे बिल्डरांना नाही, तर छोटे तुकडे खरेदी




केलेल्या सर्वसामान्य जनतेला फायदा होणार आहे. हा कायदा तुकडा खरेदी करणाऱ्याच्या सातबाऱ्यावर त्यांचे नाव यावे यासाठी आणला आहे. हा कायदा दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते दि. १५ ऑक्टोबर २०२४ या काळातील जमिनीचे तुकडे पडलेल्या जमीन मालकांना लागू असेल. हा कायदा गावठाण लगतच्या ५०० मीटर परिघीय रहिवासी क्षेत्र पर्यंत नागरी क्षेत्रातील तसेच गावठाणच्या परिघात असलेल्या रहिवासी क्षेत्रांना देखील लागू असेल असे सांगीतले.

या कायद्यामुळे सरकारी जागेवर तुकडे पाडले असल्यास, त्याचा फायदा होणार नाही आणि सदर जागा सरकारला परत करावी लागेल. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दि. ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी सूचना दिल्या आहेत. आमदार देशमुख यांनी सरकारच्या या विधेयकाचे समर्थन करीत, याचा अधिकाधिक फायदा सर्वसामान्य माणसाला होईल, याची काळजी घ्यावी, अशी मागणी केली.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर यांना आदरांजली वाहिली




**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने ८ डिसेंबर २०२५ रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार, समता आणि सामाजिक न्यायाचे जागतिक प्रतीक भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी श्रद्धेने आणि सन्मानाने आदरांजली वाहिली. सोलापूर रेल्वे विभागातील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात श्रद्धांजली समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) डॉ. सुजित मिश्रा, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) श्री अंशुमाली कुमार आणि मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (सीपीएम) श्री शैलेंद्र सिंह परिहार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना, डीआरएम डॉ. सुजित मिश्रा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक सक्षमीकरण, समानता, मानवी हक्क आणि राष्ट्र उभारणीतील अमूल्य योगदानावर विचारमंथन केले. त्यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना डॉ. आंबेडकरांचे आदर्श प्रत्येकांनी आपल्या वैयक्तिक जीवनात आणावेत व न्याय, सचोटी आणि कर्तव्य या मूल्यांना बळकटी द्यावी करण्याचे प्रतिपादन केले.

मान्यताप्राप्त संघटना आणि संघटनांच्या प्रतिनिधींनीही डॉ. आंबेडकरांच्या जीवन प्रवासावर, उपेक्षित समुदायांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेल्या अथक संघर्षावर आणि राष्ट्राला प्रेरणा देणाऱ्या त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांवर प्रकाश टाकत त्यांचे विचार मांडले.


समारंभात सर्व शाखा अधिकारी, इतर अधिकारी, संघटना आणि संघटनांचे पदाधिकारी आणि विभागातील कर्मचाऱ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला, ज्याने डॉ. आंबेडकरांच्या अतुलनीय वारशाला सामूहिक पणे वंदन केले.

## उदयगिरीत पन्नालाल सुराणा व विनायक टोम्पे यांना श्रद्धांजली

**उदगीर/प्रतिनिधी** : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा व सेवानिवृत्त कर्मचारी विनायक टोम्पे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी बोलताना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचेव सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया म्हणाले, पन्नालाल सुराणा यांची ज्येष्ठ समाजवादी विचारवंत म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला ओळख होती. नळदुर्ग येथील 'आपलं घर' च्या माध्यमातून त्यांनी अनेक अनाथांना आश्रय दिला. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के म्हणाले, शांत, संयमी व सेवाभाव जोपासणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे पन्नालाल सुराणा हे होत. त्यांच्या जाण्याने फार मोठी सामाजिक पोकळी निर्माण झाली आहे. प्रा. प्रवीण जाहूरे म्हणाले, पन्नालाल सुराणा अनेक सामाजिक चळवळींशी जोडले गेलेले होते. संपूर्ण आयुष्य समजासाठी देणाऱ्या साथी पन्नालाल सुराणा यांच्या निधनानंतर त्यांचे पार्थिव शरीर शासकीय रुग्णालयाला देहदान करण्याचा निर्णय त्यांची सामाजिक बांधिलकी दाखविणारा आहे. आपण सर्वांनी पन्नालाल सुराणा यांच्याकडून प्रेरणा घेऊन कार्य करावे, असे आवाहन केले. विनायक टोम्पे यांच्या बद्दल देखील संस्था पदाधिकारी व प्राचार्य यांनी भावांजली अर्पण केली. यावेळी संस्था सहसचिव प्रशांत पेन्सलवार, उपप्राचार्य प्रा. एस. एन. कोडचे, पर्यवेक्षक प्रा. टी. एन. सगर पर्यवेक्षक प्रा. संजय मूडपे यांची विशेष उपस्थिती होती.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# हमाल भवनावर विविध संघटनांची श्रद्धांजली

## बाबा आढावांनी कष्टकऱ्यांच्या श्रमाला प्रतिष्ठाच नव्हे तर योग्य तो मोबदला सुद्धा मिळऊन दिला : ज्येष्ठ समाजवादी नेते शिंदे



**लातूर/प्रतिनिधी** : द थोर विचारवंत तथा कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांनी, येथील अंग मेहणती असुरक्षित अशा कामगार- कष्टक-यांच्या घामाचा केवळ मोबदलाच नव्हे तर, त्यांच्या श्रमाला योग्य तो सन्मानही मिळवून दिला, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे यांनी केले. आज दुपारी २ वाजता हमाल भवन मार्केट यार्ड लातूर येथे, विविध कामगार संघटनांच्यावतीने बाबांना आयोजित करण्यात आलेल्या, श्रध्दांजली प्रसंगी ते बोलत होते. या शोकसभेच्या अध्यक्षस्थानी हमाल मापाडी गाडीवान संघटनेचे जिल्हाध्यक्ष रज्जाकभाई शेख हे होते.

प्रारंभी दिवंगत डॉ. बाबा आढाव यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करून, सर्व उपस्थितांनी सामूहिक अभिवादन केले. यावेळी बोलताना शिवाजीराव शिंदे पुढे म्हणाले की, म. फुले व डॉ. आंबेडकर हे, डॉ. आढाव यांच्या कार्याची प्रेरणा होती. सन १९७३ साली त्यांच्या ' एक गाव एक पाणवठा ' या ऐतिहासिक क्रांतिकारी चळवळीमध्ये, आपल्या भागात अवघ्या १२ दिवसात, सुमारे ४० गावात एक पाणवठे निर्माण केले गेले. त्यांनी श्रमिकांसाठी त्यावेळी केवळ २५ पैशामध्ये कष्टाची भाकर हे जेवन उपलब्ध करून दिले. आपण विविध अशा, सर्व कामगार संघटनांचे कष्टकरी कार्यकर्ते, आज एकमेकाच्या हातात हात घालून, बाबांची प्रेरणा टिकवून आपल्या हक्क, अधिकार व कर्तव्याचे जागरूकपणे संरक्षण करू या, असे आवाहनही शिंदे यांनी केले. याप्रसंगी महिला हमाल गाडीवान संघटनेच्या जिल्हाध्यक्ष वेणुताई आदमाने म्हणाल्या की, आम्ही बाबांचा संदेश कायम प्रमाण मानला. दोन दिवसाखाली त्यांच्यासाठी सर्व महिलानी सामूहिक प्रार्थना केली. मात्र नियतीने बाबांना हिराऊन, आम्हा स मोठा धोका दिला ! असे म्हणतांना, त्यांचे दोन्ही नेत्र डबडबले होते. तर गोंविद गवळी या हमालाने बाबां गात असलेले नेहमीचे गित, ' आभाळाची आम्ही लेकर, काळी माती आई । जात वेगळी नाही आम्हा, धर्म वेगळा नाही ।...' हे धृवपद गाऊन, हीच माणुसकीची शिकवण त्यांनी आम्हाला दिली म्हणत, त्यांनी आपला हुंदका गिळून घेतला. तर बशीर भाई शेख हे वयाच्या साठीतील, एक हमाल कामगार उत्स्फुर्तपणे म्हणाले की, बाबांनी आम्हा फाटक्यांना इज्जत आणि अभिमान मिळवून दिला. त्यांची ही प्रेरणा आम्ही विसरु शकत नाही, असे म्हणत जड अंतःकरणाने ते बसले.



या प्रसंगी राष्ट्रसेवा दलाचे जिल्हाअध्यक्ष पांडु रंग देडे, आडत असोशीयनचे उपाध्यक्ष श्री सुरेश धनुरे, जनसेवा माथाडी व श्रमिक कामगार संघटनेचे माणिकराव पाडोळे, कामगार आघाडीचे श्री नितीन कोरे, रेणापूर पं. स. चे माजी सभापती श्री रमेशराव सुर्यवंशी, चंद्रवर्धन खंदाडे, लोकसेवा संघटनेचे लिंबराज वाघमारे, राष्ट्रीय गुमास्ता महामंडळाचे जोतीराम कदम, राष्ट्रीय संचालक गंभीरे नाना, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री शिवाजीराव कांबळे व भानुदासराव कांबळे यांनी शब्द भावांजली अर्पण केली. तर हमाल मापाडी महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष, हर्षवर्धन सवाई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आणि सूत्रसंचालन रामकुमार रायवाडीकर यांनी केले. या समई संजय केंद्रे, शंकर शिंदे. दिलीप जंगले, संजय व्यवहारे, राम कैले, जिल्हाध्यक्ष गोविंद लहुबंदे, अंजना सांवत, शाम वरयानी, लक्ष्मीबाई कांबळे, उषा सुर्यवंशी, सूरज पाटील, अंजना लोंढे, उषा कांबळे, अहिल्याताई समुखराव, भरत कांबळे, गफारभाई काझी, सारंग सोनवणे इत्यादी बहुसंख्यने उपस्थित होते. तर त्यापूर्वीच आज सकाळीच येथील आडत व्यापारी संघटना व राष्ट्रीय गुमास्ता मंडळाने संपूर्ण मार्केड यार्डातील व्यापार - व्यवसाय बंद ठेऊन, डॉ. बाबा आढाव यांना श्रध्दांजली अर्पण केली.

### निलंगा नगरपरिषद, रेणापूर नगरपंचायत हद्दीत २० डिसेंबर रोजी मद्यविक्री बंद

#### मतमोजणी होणाऱ्या सर्व ठिकाणी २१ डिसेंबर रोजी मद्यविक्री बंद



**लातूर/प्रतिनिधी** : राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. तसेच दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीची मतमोजणी होणार आहे. त्यामुळे २० डिसेंबर रोजी निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायत हद्दीतील सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहणार आहे. तसेच २१ डिसेंबर रोजी उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीची मतमोजणी होणाऱ्या ठिकाणची सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, मद्यविक्री नोंदवही इ.) नियम १९६९ च्या संबंधित कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुध्द महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ व त्या अंतर्गत असलेल्या नियमांतर्गत तरतुदीनुसार कडक कारवाई केली जाईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

### औराद येथे थंडीचा कहर, महाबळेश्वरला मागे टाकत पारा ८ अंशावर: जानेवारी अखेरपर्यंत थंडीचा जोर कायम राहणार

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहरासह जिल्ह्यात मागील २० ते २५ दिवसांपासून थंडीचा जोर वाढला आहे. हवामान तज्ज्ञांनी डिसेंबर आणि जानेवारी महिन्यामध्ये तापमानाचा पारा ८ अंशापर्यंत घसरले असा अंदाज व्यक्त केला होता. दरम्यान, लातूरच्या निलंगा तालुक्यातील औराद येथे हवामान मापन केंद्रामध्ये सोमवार, दि. ८ डिसेंबर आणि मंगळवार दि. ९ डिसेंबर या दोन दिवसात पारा ८ अंशापर्यंत घसरल्याची नोंद झाली. एकिकडे महाराष्ट्रील सर्वात थंड ठिकाण असलेले महाबळेश्वर येथे थडींचा पारा हा १४.३ अंश एवढा असून त्यापेक्षा कमी लातूरचा असल्यामुळे महाबळेश्वर पेक्षाही लातूर थंड ठरले आहे.

## प्रा. यशवंतराव केळकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्थायी कार्यकर्त्यांचे लातूरमध्ये भव्य एकत्रीकरण

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शाखेच्या वतीने ७ डिसेंबर रोजी स्वर्गीय प्रा. यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी वर्ष व पुण्यस्मरणाच्या निमित्ताने स्थायी कार्यकर्त्यांचे दिवसभराचे एकत्रीकरण केले. लातूर, उदगीर, धाराशिव आणि अंबाजोगाई येथील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विद्यार्थी दशेत काम केलेल्या १९७० पासून ते २०२५ पर्यंतच्या सर्व स्थायी कार्यकर्ते या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री संजय पाचपोर (सहकार भारती, राष्ट्रीय संघटनमंत्री) तसेच श्री देवदत्त जोशी (अभाविप, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री) उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या या एकत्रीकरणात अभाविपचे देशभर वाढलेल्या कामाबद्दल श्री देवदत्त जोशी यांनी अभाविपची सद्यस्थिती मांडली.




एकत्रिकरणास आलेल्या कार्यकर्त्यांच्या कालावधीशः गटांमध्ये बैठकी संपन्न झाल्या. ज्यामध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. स्थायी उपक्रम सुरू करून समाजाच्या विविध क्षेत्रात नवीन आदर्श निर्माण करण्यासाठीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. त्याच बरोबर संघटन बळकटीकरण, युवा सहभाग, सामाजिक उपक्रम, भविष्यातील नियोजन या विषयांवर देखील चर्चा झाली. यावेळी विद्यार्थी परिषदेचे काम केलेले आणि सध्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे प्र- कुलगुरू असलेले प्रा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन तसेच राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांचे स्वागत श्री देवदत्त जोशी (अभाविप, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री) यांच्या हस्ते करण्यात आले. यावर्षी वंदे मातरम या गीताला १५० वर्ष पूर्ण झाले त्या निमित्ताने वंदे मातरम गीतावर कथ्थक नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. यानंतर स्वर्गीय प्रा. यशवंतराव केळकर यांनी अभाविपच्या कामात मांडलेली भूमिका पुढे चालून विद्यार्थी परिषदेची कार्यपद्धती झाली. त्यांच्या आदर्श जीवन पद्धतीने त्यांनी संघटनेच्या कामाला एक वेगळे वळण दिले. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळे संघटनेला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. श्री मिलिंद भणगे यांनी रचलेल्या यशवंतरावांच्या जीवनावर आधारित दृकश्राव्य अभिवाचन कार्यक्रमाचे सादरीकरण देखील करण्यात आले. या अभिवचनाच्या माध्यमातून यशवंतरावांच्या जीवनातील विविध प्रसंगांना उजाळा देण्यात आला.

### माफिया ..

चाले धंदा उघडपणे
मुक्त गुटखामाफिया
सुटतात सुत्रधारखरे
का देतात माफी या

घालात्वरित पायबंद
फक्त येती प्रतिक्रिया
गजाआड कराय का
कठिण अतिप्रक्रिया

ड्रग्स असूर भयानक
सगळे करे अवक्रिया
खोलवर रूजले रोप
वाढेसतत अविक्रिया

उध्वस्त कोवळीपिढी
विवरे पाडली हृदया
भविष्य निसटे हातून
दयनीय झालीयं दया

विकलाअमोलआत्मा
बळी देतो या सुप्रिया
करे कमाई पातकावर
नाही फिकीर निर्दया

होई सक्रीय आपणचं
कुणी ना ये अवलिया
सावध हवी तरूणाई
छेदावया धुंदी वलया

शिक्षा सोबत प्रबोधन
बदल घडवेल किमया
उजळावी अंधार राज
धूपदीपासहीत समया

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

### दयानंद कला महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम : एक कप चहासाठी एकमेकांच्या भेटीसाठी

**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव श्री. रमेश बियाणी यांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून दयानंद कला महाविद्यालयात 'एक कप चहासाठीएकमेकांच्या भेटीसाठी'हा अत्यंत स्तुत्य आणि महत्त्वपूर्ण उपक्रम मोठया उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका आणि कार्यालयीन कर्मचारी यांच्यामध्ये संवाद, समन्वय व स्नेह वृद्धिंगत करणे हा होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्णत्वास गेला. यात उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांनी विशेष पुढाकार घेतला. दिवसभराच्या व्यस्त शैक्षणिक कार्यातून थोडासा विरंगुळा देत, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी एका अनौपचारिक वातावरणात एकत्रित आले.

चहाच्या वाफाळलेल्या कपांसोबत सर्वांनी एकमेकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या, विचारांची देवाणघेवाण केली आणि कामकाजातील अनुभव मोकळेपणाने व्यक्त केले. तसेच, कार्यसंस्कृतीतील समन्वय सुधारण्यासाठीच्या सूचनांवरही सकारात्मक चर्चा झाली. या उपक्रमाने महाविद्यालयाच्या कार्यसंस्कृतीतील सहकार्याची भावना बळकट करण्यासाठी एक सकारात्मक आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे.

याप्रसंगी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले, ''दयानंद शिक्षण संस्थेच्या या अभिनव उपक्रमामुळे सर्व कर्मचाऱ्यांमधील शैक्षणिक सहसंबंध अधिक दृढ झाले आहेत. विचारांची ही देवाणघेवाण महाविद्यालयाच्या कामात सकारात्मक दृष्टिकोन आणण्यास निश्चितच मदत करेल.'' मैत्री, बांधिलकी आणि परस्पर संवाद वाढविण्यासाठी हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला आहे. प्राध्यापक व कर्मचारीवर्गाकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम पुढेही नियमितपणे राबविण्याचा मानस महाविद्यालयीन प्रशासनाने व्यक्त केला असून, दयानंद कला महाविद्यालयाचा हा उपक्रम शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांसाठी एक उत्कृष्ट आदर्श ठरणारा आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी सीबीएसई स्कूलमध्ये स्वरपौर्णिमा न्हाऊन निघाली अभंगाच्या भक्तीसुरात

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर येथील राजा नारायणलाल लाहोटी सीबीएसई स्कूलमध्ये श्री दत्त जयंतीदिनी मासिक स्वरपौर्णिमेनिमित्त अभंग गायन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. श्री दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय संगीत विभाग प्रमुख डॉक्टर देवेंद्र कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यालयातील विविध गट अंतर्गत दरवर्षीप्रमाणेच यावर्षीही अभंग गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



प्रमुख अतिथी डॉक्टर देवेंद्र कुलकर्णी , स्पर्धेचे परीक्षक श्री संतोष बिडकर श्री मयूर येणगे , विद्यालयाचे चेअरमन आनंदजी लाहोटी, संस्था पदाधिकारी श्री अशी जी सोमाणी ,विद्यालयाचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू , विद्यालयाचे रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर यांच्या हस्तेश्रीदत्त श्री पांडुरंग व श्री सरस्वतीच्या प्रतिमापूजनाने या स्पर्धेचा प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज हाऊस चाणक्य हाऊस सम्राट अशोका हाऊस आर्यभट्ट हाऊस अशा चार सदनांमधून प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात अभंग सादरीकरण करण्यात आले. या अभंगासाठी सूत्रसंचालनही गटातील विद्यार्थ्यांनीच केले.

जगत्वंद्य अवधूत दिगंबर दत्तात्रेय गुरु तुम्हीच ना या श्री गुरुचरित्र सार असणाऱ्या नामघोष, नाम गाऊ नाम घेऊ, आजी सोनियाचा दिनु, माझ्या बोबडिया बोला, भोळा राजा शिवशंकर, वेढा वेढा रे पंढरी, कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी, ज्ञानाचा सागर, जेथे जातो तेथे तू माझा सांगाती अशा सुंदर अभंग सादरीकरणाने विद्यालयाचा आसमंत भक्तिमय झाला होता.

या सुखा कारणे देव वेडावला । वैकुंठ सोडूनी संत सदनी राहिला।। अशीच अनुभूती या सादरीकरणावेळी येत होती.

अभंग सादरीकरणासाठी उपस्थितांनी उत्साहाने भरभरून असा प्रतिसाद दिला व कलाकारांचे कौतुक केले.या स्पर्धेत सदनाने प्रथम क्रमांक मिळवून अभंग गायन स्पर्धेचा चषक पटकावला. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक छत्रपती शिवाजी महाराज सदन यांनी मिळवले व चषक देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेचे सूत्रसंचालन स्वरांजली देशपांडे तर आभार प्रदर्शन रूपा शिरसीकर यांनी केले. याप्रसंगी उपस्थित बीके भालेराव आशिष बनसोडे देवयानी देशपांडे संदीप केंद्रे ज्ञानेश्वर यादव, शिरीष देशपांडे कृष्णा कुलकर्णी गीता मुंडे कौस्तुभ सर व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६